REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 3 | DECEMBER - 2021

# महाराष्ट्राची प्राचीनता व महाराष्ट्र नाम व्युत्पत्ती मत मतांतरे ऐतिहासिक दृष्टीकोन

**प्रा.डॉ.संजय जिभाऊ पाटील**
के.एन.बी.कला महाविद्यालय, नवलनगर ता. जि. धुळे

## प्रस्तावना :



वर्तमान काळात भारतील अनेक राज्यांपैकी एका राज्याला महाराष्ट्र या नावाने ओळखले जाते.भारतातील महाराष्ट्र राज्याची पुरोगामी राज्य म्हणुन ओळख आहे.या राज्याचा प्राचीन मध्ययुगीन व आधुनिक काळातील एक वैभवशाली इतिहास आहे. महाराष्ट्राने वर्तमान काळात अनेक क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटविला आहे. या राज्याने शैक्षणिक सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक,विज्ञान व तंत्रज्ञान अशा नानाविध क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे.तेंव्हा या सर्व दृष्टीने प्रगत राज्याचे प्राचीनत्व काय आहे.तसेच या राज्याला महाराष्ट्र हे नाव कसे पडले याचा ऐतिहासिक दृष्टीकोनातुन अल्पसा शोध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधातून केला आहे.

## मानवी इतिहासाचे कालखंड

मानवी इतिहासाचे साधारणपणे तीन कालखंड मानले जातात.त्यामध्ये प्रागैतिहासिक दुसरा इतिहासाचा उष:काल आणि तिसरा इतिहास काळ. प्रागैतिहासिक काळातील ,कोणत्याही प्रकारचा लिखित पुरावा उपलब्ध नाही.दुस-या कालखंडात कुठल्या ना कुठल्या स्वरुपात लिखित पुरावा मिळत असला तरी त्याची उकल मात्र होत नाही.मात्र इतिहासकाळात मानवी लिखाणाचे भरपूर पुरावे उपलब्ध होतात.भारतामध्ये लिखाणाचा पहिला पुरावा सम्राट अशोक मौर्याच्या प्रस्तरलेखाच्या स्वरुपात उपलब्ध आहे. पाषाण युगाचे प्रमुख तीन खंड पाडले जातात.त्यामध्ये पुराश्मयुग Polacolithic, मध्याश्मयुग, Maseolithic नवाश्मयुग Neolithic यातील पुराश्मयुगाची विभागणी तीन उपखंडामध्ये करण्यात येतेते म्हणजे पूर्व पुराश्मयुग, मध्यपुराश्मयुग, उत्तरपुराश्मयुग होय. यातील पूर्वपुराश्मयुगाची प्राचीनता कार्बन 14 त्याचप्रमाणे युरोनियम ॲसोटोप पदधतीचा वापर करुन सुमारे एक लक्ष 20 हजार वर्षांहुनही अधिक प्राचीन असावी असे सिदध करता आले आहे.[1]

महाराष्ट्रातील माणसाचे जीवन दोनलक्ष वर्ष जुने असावे अशी समजूत विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत होती.परंतु सन 1987 मध्ये कुकडी नदीत ज्वालामुखीय राखेखालील काळया मातीतील मानवी अवशेष सापडल्यानंतर या समजुतीला तडा गेला.महाराष्ट्रातील मानवी वस्तीला सर्वात प्राचीन पुरावाआदय पुराश्मयुगकालीन (Early Polacolithic) म्हणजे सुमारे 20 लक्ष वर्षांपूर्वीचा आहे[2]

महाराष्ट्रातील एकूण प्राणिज आणि मानवीय पुराव्यांवरुन असे लक्षात येते की महाराष्ट्रातील प्राणीज अवशेष 20 हजार वर्षांपूर्वीचे आणि त्यानंतर 5 हजार वर्षांपूर्वीचे मिळतात. अश्मयुगीन अवशेष मात्र 15 लक्ष वर्षांपासून सलगपणे मिळतात. महाराष्ट्राच्या पठारी भागात स्थीर जीवन जगणा-या मानवाचे अवशेष 3.5 हजार वर्षांनंतरचे आढळतात.दायमाबाद आणि इनामगाव ही अशा वस्त्यांची उदाहरणे आहेत.तर आदयपुराश्मयुगापासून मराठयांच्या काळापर्यंतच्या वस्तींचे सलगपणे मिळणारे नेवासे हे महाराष्ट्रातील एकमेव उदाहरण आहे.[3]

## महाराष्ट्राचे प्राचीनत्व :

वर्तमान काळात आपण ज्या प्रदेशाला महाराष्ट्र असे संबोधतो हे नाव कधी मिळाले ? हया प्रदेशाची ओळख काय ? या प्रश्नांचा शोध घेता महाराष्ट्रासंबंधिचा पहिला लिखित पुरावा आढळतो तो सिंहीली भाषेत लिहिलेल्या बौदध धर्मातील दीपवंस आणि महावंस या ग्रथांमध्ये सम्राट अशोकच्या काळात तात्कालिन महाराष्ट्रात अर्थात आजच्या या महाराष्ट्रात बौदध धम्माचा प्रवेश झाला.या संदर्भात म.म.वि.वा. मिराशी लिहितात," यामध्ये स्थविद मज्जर ठिक यांना काश्मीर आणि गांधार या देशात पाठविण्यात आले.महाराष्ट्र स्थित यांना यवन देशात माज्झिमा यांना हिमालय प्रदेशात धम्मरक्षित यांना महाराष्ट्रात स्यवीर महादेव यांना महिषमंडळ प्रदेशात (आंध्रप्रदेशाचा पश्चिम भाग)रक्षित यांना वनवासी (उत्तर कानडा जिल्हा)सोना आणि उत्तरा यांना सुवर्णभूमी (ब्रहमदेश) तर महेंद्र आणि त्याच्या सहकार्यांना श्रीलंकेत पाठविण्यात आले.[4]

## महाराष्ट्र राज्याची उत्पत्ती मते मतांतरे :-

महाराष्ट्र हे महाराष्ट्राचेच प्राकृत रुप आहे असे प्राकृत व्याकरणकारांचे मत आहे.ती पुढीलप्रमाणे नोंदविलेली आहेत.

### 1. डॉ. जॉन विल्सन:

मोल्स वर्थ यांनी सर्वप्रथम असा तर्क काढला की महारांच्या नावावरुनच या प्रदेशाला महाराष्ट्र असे नाव पडले आहे.डॉ.जॉन विल्सन यांनी या तर्काला पुष्टी देऊन गुर्जरांचे राष्ट्र ते गुर्जराष्ट्र ,शूरांचे राष्ट्र ते सौराष्ट्र तदवतच महारांचे राष्ट्र ते महाराष्ट्र असा तौलनिक विचार डॉ.विल्सन यांनी मांडला.जे.टी.मोलसवर्थ यांनी आपल्या शब्दकोशात महाराष्ट्र या शब्दाचा अर्थ सांगितला "Now Maharashtra may mean the country of Mahars tribe skill known as the provience thought in degraded position and still nuberous thought the Maratha country that there runs[5]

### 2. डॉ.श्रीधर व्यंकटेश केतकर :

' प्राचीन महाराष्ट्र ' या संशोधन ग्रंथात ज्ञानकोशकार डॉ.केतकर महाराष्ट्राच्या उत्पत्तीसंबंधी सांगतात की "महाराष्ट्र यात महार आणि रट्ट या दोन राष्ट्र जातीच्या नामाचा संयोग होऊन महारट्ट असे तयार झाले व त्याचे पुढे महाराष्टीक व कालांतराने महाराष्ट्र असे संस्कृतीकरण झाले असे माझे याविषयी अंतिम विधान आहे.रट्ट या नावाचे लोक चोहोंकडे हिंडत होते आणि त्यांच्या भ्रमणाची स्मारके चोहिकडे आहेत. सौराष्ट्र ऊर्फ सोरठ आरठ्ठ वैगरे उदाहरणे रट्टांच्या भ्रमणांची स्मारके आहेत.रट्ठ या शब्दाचा अर्थ राष्ट्र किंवा लोक असाच असावा महाराष्ट्र हे नाव सर्वप्रथम कधी उदयास आले या संदर्भात डॉ.केतकर म्हणतात, दंडकारण्यामध्ये म्हणजे पश्चिम भागात रट्ठांची वस्ती वाढु लागली असेल म्हणजे तेथील लोक महार आणि देश या भागालाच महार व रट्ठ ही दोन्ही नावे संयुक्त होऊन महाराष्ट्र हे नाव लागले असावे.[6]

राष्ट्र या शब्दाच्या अर्थाविषयी डॉ.शरद पाटील म्हणतात कौटील्याच्या अर्थशास्त्रात 'राष्ट्र' या शब्दाचा अर्थ होतो जनतेची प्रजेची जमीन तर 'सीमा' चा अर्थ होतो राज्याची खाजगी जमीन.तर कोसंबी हे राष्ट्राचा अर्थ अचुकपणे गणांची जमीन असा लावतात दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्याचा अर्थ होतो 'गणांची सामुहीक जमीन'

यावरुन असे स्पष्ट होते की, महाराष्ट्र भूमी ही महार गणांची भूमी होती.नाग हे या भूमीचे मुळ मालक होते नागांचे मुख्य वस्तीस्थान महाराष्ट्र होय नाग हे आजचे महार आहेत.म्हणुन महारांचे राष्ट्र हे महाराष्ट्र ही उत्पत्ती योग्य वाटते.शिवाय राजाराम शास्त्री भागवत यांनीही प्रथम अशा पदधतीने महारांचे राष्ट्र म्हणजे महार राष्ट्र असा सिद्धांत मांडला

## 3. डॉ.भांडारकर :-

डॉ.भांडारकर यांच्या मते महाराष्ट्राचे नामकरण राष्ट्रीय किंवा रट्ठ नावाच्या लोकांवरुन झाले असून या मतास थोडेफार पुरावे मिळतात.ही बाब नाणे घाट, कार्ले-भाजे व कान्हेरी येथील लेण्यांतील शिल्पालेखांवरुन दिसुन येते.या शिलालेखात 'महारठीनी' व महारठी अशी स्त्री-पुरुष वाचक विशेषणे आढळतात नाने घाट शिलालेख क्र.6 यात "महारठ्ठी गण हिरो " असा स्पस्ट उल्लेख आढळतो.भाजे व भेडसे लेण्यातही महारठी केसकी पुतस विव्हुदतस व महाभोज बलिकाय महादेनीय महारठीनीय असे उल्लेख आहेत जातीनामाचा संयोग होऊन महाराष्ट्र असे रुप तयार झाले.[8]

डॉ.भांडारकरांच्या मते राष्ट्रीक अथवा रट्ठ या नावाचे प्रसिद्रध असे लोक होते.रट्ठ या जातीचे लोक पुरातन काळापासुन दक्षिणपथाच्या (दक्षिणेच्या) राजकारणात सर्वापेक्षा अधिक दृगोचर होतात. चालुक्याच्या उदयापूर्वी त्यांच्या जातीतील एक पोटजात राष्ट्रकुट नावाचे राजे बेळगाव जिल्हयातील सुगंधवती व सौदंती येथे राज्य करीत होते.भोजराजे विदर्भ व दक्षिणेचा इतर भाग यावर अधिकार चालवित होते.भोज हे आपल्याला महाभोज असे म्हणवित असत.त्यांच्या देशाला 'महारठ्ठ' असे नाव पडले.यालाच संस्क्तमध्ये महाराष्ट्र असे संबोधले आहे.[9]

## 4. इरावती कर्वे :

इरावती कर्वे यांनी जेथपर्यंत महार पोहोचले तेथपर्यंत महाराष्ट्र अशा शब्दात महाराष्ट्राची व्याप्ती सांगितली आहे.कारण महारांची वस्ती मुळीच नाही अशी गावे त्यांना त्यांच्या भ्रमंतीत आढळली नाहीत. महार व महाराष्ट्र यांच्यातील संबंध सूचीत करणारे एक वाक्य लिळा चरित्राच्या एका पोथीत सापडते ते असे तुझी

या महारांचा महाराष्ट्र होऊनी नीचिजातु असे हे वाक्य महाराष्ट्राचा त्याग करतांना माचिता हरी यांच्या तोंडी आलेले आहे.[10]

### 5. पु.ग.सहस्त्रबुदधे

महारांचे राष्ट्र ते महाराष्ट्र या उत्पत्तीस आक्षेप घेत पु.ग.सहस्त्रबुदधे म्हणतात की महार हा शब्द प्राचीन काळी एखादया जमातीचे नाव म्हणुन रुढ असल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही ऐतरेतर ब्राहमण उपनिषदात विश्वमित्राने स्वत:च्या पुत्राना त्यांनी अवज्ञा केली म्हणुन शाप दिला व तेच पुढे आंध्र, भुतिव,पुंडु शबर झाले असा उल्लेख आहे.याखेरीज शक, यवन, बरवन,शबर, मेलेचछ, अभिर, हुन,कुशान इ.अनेक आर्येतर व रानटी जमातीचा उल्लेख पुराणामध्ये येतो.पण महार हा शब्द आर्य व अनार्य कोणालाच लावलेला नाही.मनु ने कैवर्त, चांडाळ किरात दरद खस इ.जातींचा उल्लेख केला आहे.पण महार हे नाव कोठेही नाही.[11]

महाराष्ट्र हे नाव वंशावरुन किंवा जातीवरुन पडले नसून देशाच्या विस्तारावरुन पडले असावे सातवाहन साम्राज्यात महाराष्ट्रातले अनेक घटक विभाग एकत्र झाले व त्या मोठया प्रदेशाला महाराष्ट्र हे नाव मिळाले.

### 6. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे -

इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी 'राधामाधवविलासचंपु' या ग्रथांतील प्रस्तावनेत असे मत मांडले आहे की, इ.स.पूर्व 500-600 च्या सुमारास मगध येथील महाराजांचे भक्त जे महाराजिक म्हणजेच महाराष्ट्रीक लोक ते तेथील बौदध व जैन धर्मीय राज्यराच्या जुलुमाला कंटाळुन दक्षिणेस वसाहत करण्यासाठी आले.त्यांच्या बरोबरच कुरु पांचाळातुन राष्ट्रीक नावाची व उत्तरकुरु आणि उत्तरमुद्र येथुन वैराष्ट्रीक येथून हे लोक आलेत त्यातील महाराष्ट्रीक हेच संख्येने खुप असल्याने सर्वांनाच पुढे महाराष्ट्रीक म्हणु लागले त्यावरुन या भूमीला महाराष्ट्र हे नाव पडले.[12]

महाराष्ट्राचा वसाहत काल या लेखात आणि राधामाधव विलासचंपू या ग्रंथाच्या प्रस्तावनेत महाराष्ट्र नावाची व्युत्पत्ती व महाराष्ट्रीयांच्या पूर्वजांची परिभ्रमणे देण्याचा आणि वंशनिश्चय करण्याचा प्रयत्न वि.का.रजवाडे यांनी केला आहे.त्यांच्या मते मगध देशाधिपती महाराजांचे ते महाराष्ट्रीक बौद्रध क्रांतीला कंटाळुन दक्षिणारण्यात शिरले त्यांच्या दक्षिण प्रवेशाचा काल शकपूर्व सहाशे असा आहे.अशोकाच्या शिलालेखात उल्लेखिलेले राष्ट्रीक (रिस्टिक)आणि महाराष्ट्रीक अगदी निरनिराळे होते. या महाराष्ट्रीकांनी नर्मदेपासून भिमेपर्यंतचा किनारा आणि देवगिरीपासून पैठणचा प्रांत व्यापला कालांतराने महाराष्ट्रीकाच्या खालच्या भागातले वैराष्ट्रीक आणि राष्ट्रीक यांचाही समावेश महाराष्ट्रीकात होऊन या तिघांचे देश मिळुन त्रिमहाराष्ट्रीक बनले[13] यापुढे राजवाडे म्हणतात हे महारट्ठ उर्फ महाराष्ट्रीक लोक कोण ? याबाबतचा प्रपंच महाराष्ट्राचा वसाहत काल या लेखात केला आहे.महाराजालुज या सुत्रात पाणिनी म्हणतो की महाराज हा ज्यांच्या भक्तिचा विषय त्याना महाराजिक म्हणतात.महाराज म्हणजे कोण महाराज या शब्दाचे पाणिनी कालीन दोन अर्थ होते.महाराज म्हणजे इंद्र व महाराज म्हणजे सामान्य राजा हुन मोठा राजा पैकी पहिला अर्थ घेतला तर महाराजिक हे लोक इंद्राचे भक्त ठरतात.आणि दुसरा अर्थ घेतला तर महाराज संज्ञक किंवा महाराज पदवीधर भूपतीचे जे भक्त ते महाराजिक ठरतात.महाराजिक शब्दाचे दोन्ही अर्थ घेतले तरीही महाराजिक शब्दाचा महाराष्ट्रीक शब्दाशी काय संबंध येतो. राजा ज्या भूमीवर राज्य करतो त्या भूमीला राष्ट्र म्हणत आणि राष्ट्र हे ज्यांच्या भक्तिचा विषय

त्यांना राष्ट्रीक म्हणत. त्याप्रमाणे महाराजा ज्या भूमीवर महाराज्य करी त्या भूमीला महाराष्ट्र म्हणत.आणि महाराष्ट्र ज्यांच्या भक्तिचा विषय त्यांना महाराष्ट्रीक म्हणत.[14]

### 7. पंडित महादेव शास्त्री जोशी :

पंडित महादेव शास्त्री जोशी यांच्यामते आज आपण ज्याला 'महाराष्ट्र' म्हणतो त्या सर्व भूप्रदेशाला एक अभिधान प्राप्त होण्यापूर्वी पासूनच त्याच्या भिन्न भिन्न घटक विभागात महाराष्ट्र संस्कृतीविषयी जोपासना होत होती.विदर्भट,अश्मक ,कुंतल,अपरान्तक गोपराष्ट्र मल्लराष्ट्र पांडूराष्ट्र ही त्या विभागाची नावे प्राचीन संस्कृत वाङ्मयात आलेली आहेत.विदर्भाचा प्रथम उल्लेख बृहदारण्यकोपनिष्दात सापडतो आर्य लोक दक्षिणेत आले ते प्रथम विदर्भ व अपरान्तक प्रांतात आले विंध्यपर्वताच्या पश्चिमेकडुन भृगुऋषी अपरान्तात व अगस्तऋषी पूर्वेकडून विदर्भात उतरले.रामायण,महाभारत या ग्रंथात विदर्भाचा उल्लेख अनेकदा आला आहे.त्या नंतर अश्मक या गोदावरीवरील प्रदेशात वसाहत झाली.प्रतिष्ठान (पैठण) ही त्यांची राजधानी होय[15]

### 8. डॉ.पा.वा.काणे :-

डॉ.पा.वा.काणे हे डॉ.भांडारकरांचे मत चुक ठरवून आपले मत मांडतांना ते दर्शनिक अर्थाचेच समर्थन करतात. महाराष्ट्र म्हणजे मोठे अथवा विस्तृत राष्ट्र हा दर्शनी अर्थ इतिहाससूचक आहे हे लक्षात घेऊन ते म्हणतात की इतिहासाला ज्ञात असलेल्या अगदी प्राचीन काळा पासून दक्षिणेत महाकांतार दंडकारण्य अथवा महारटी नावाचे एक सुप्रसिद्रध अरण्य होते.हळुहळु या अरण्याचा नाश होऊन तेथे वासाहत झाली शहरे गावे वाढली त्याला महाराष्ट्र हे नाव मिळाले.[16]

### 9. कुलगुरु चिंतामण वैद्य

कुलगुरु चिंतामण वैद्य यांच्यामते पाणिनी च्या नंतर च्या काळात म्हणजे इस.पूर्व् 600च्या सुमारास आर्यलोक दक्षिणेत आले व गोपराष्ट्र व मत्तल राष्ट्र पांडु राष्ट्र अशा वसाहती करुन राहिले.सम्राट अशोकाच्या शिलालेखात राष्ट्रीक लोकांचा उल्लेख येतो हे राष्ट्रीक लोक म्हणजे हेच लोक आहेत आंध्रभृत्यांच्या वेळी ते एका सत्तेखाली आले तेंव्हा भोजाचे जसे पूर्वी महाभोज झाले तसेच राष्ट्रीकांचे महाराष्ट्रीक झाले.त्यांच्या नावावरुनच पुढे महाराष्ट्रहे नाव पडले[17]

### 10. चि.वि.वैद्य

यांच्या मते कुंतल हा कृष्णेच्या उगमाजवळचा देश होय.अपरांतक म्हणजे कोकण.कोकण प्रदेश हा प्राचीन काळापासुन विदर्भाइतकाच प्रसिदध आहे.महाभारत, धर्मसूत्रे व अशोकाचे शिलालेख यात अपरांतकचे उल्लेख आढळतात.शृंगेरी ही त्याची राजधानी होती.गोपराष्ट्र म्हणजे नाशिकच्या भोवतालचा प्रदेश होय. महाराष्ट्र हे त्याचया दक्षिणेला होते. या सर्व प्रदेशाची भाषा प्राकृत होती.या सर्वांचा मिळुन एक प्रदेश निर्माण झाला त्यालाच कालांतराने महाराष्ट्र हे नाव प्राप्त झाले.[18]

### 11. डॉ.गुस्ताब ओपार्ट :

डॉ.गुस्ताब ओपार्ट हे महार व मल्ल यांचा संबंध जोउतात व महाराष्ट्राला मल्लराष्ट्र म्हणत असे सांगतात.त्यांच्या मते मल्ल आणि महार एकच त्यापासून मार,म्हार,महार असे लोकवाचक नाव होते त्यावरुन मल्लांचे राष्ट्र म्हारांचे राष्ट्र महारांचे राष्ट्र ते महाराष्ट्र हे देशनाम तयार झाले.मल्ल राष्ट्र व महाराष्ट्र हे दोन्ही शब्द उपयोगात होते पहिला शब्द उपयोगात येईनासा झाला व पुढे महारांचा पाडाव झाल्याने महाराष्ट्राचा व त्याचा संबंध विस्तृत होऊन महाराष्ट्राचा मोठे राज्य असा अर्थ निघालामल्लांच्या व महारांचा देश हे नाव नाहिसे झाले.[19]

## 12. डॉ.बाबासाहेब आंबेडकर :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी The Maharas; who are they and how they become Untouchable ? या निबंधात डॉ.विल्सन यांची महाराचे राष्ट्र म्हणजे महाराष्ट्र ही व्युत्पत्ती नाकारली यावर त्यांनी दोन आक्षेप घेतले एक म्हणजे महारांचे राष्ट्र म्हणजे महाराष्ट्र नसून महान राष्ट्र म्हणजे महाराष्ट्र,दुसरे असे की उत्पत्ती महार लोक आज ज्या दयनीय सामाजिक स्थितीत आहेत की जे एके काळी इतिहासात या देशाची शासनकर्ती जमात होती हा उच्च दर्जा देण्यास ही उपपत्ती असमर्थ ठरते त्यामुळे त्यांनी डॉ.विल्सन यांचे मत नाकारले आहे.तसेच डॉ..बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की ज्ञानेश्वरी या एकमेव ग्रंथाशिवाय कोणत्याही वेद पुराण स्मृती ग्रथामध्ये महारांचा एकही साधा उललेख यापूर्वी का नसावा .या शिवाय मनु स्मृती आणि बौदध वाडमयातही उल्लेख का नसावा.जर प्राचीन वाङःमयात महार हे नाव नसेल तर महाराष्ट्राचे नाव महारांवरुन ठेवले हे कसे शक्य आहे? महार हे सुद्धा महाराष्ट्राचे मुळ रहिवासी नसून त्यांचे संबंध राजपूत क्षत्रिय यांच्याशी जुळतात[20]

नंतरच्या काळात मात्र डॉ.आंबेडकरांनी आपल्या मतात बदल करुन महार हे पुरातन नागवंशीय आहेत व त्यांची वस्ती नागपूर या नागांच्या गावाच्या आसपास होती असे वक्तव्य इ.स.1954 च्या बौदधम्म दिक्षेच्या प्रसंगी केले आहे. [21]

## समारोप :

महाराष्ट्राच्या प्राचीनत्वाचा विचार केला असता ते इतिहासपूर्व कालीन असल्याचे लक्षात येते. महाराष्ट्राची प्राचीन ओळख सुमारे 20 लक्ष वर्षांपूर्वीची आहे महाराष्ट्रात पठारी प्रदेशात स्थिर जीवन जगणाऱ्या माणसाचे अवशेष 3.5 हजार वर्षांनंतरचे आढळतात.तसेच या राज्याला महाराष्ट्र या नावाचा लिखित पुरावा बौद्ध ग्रंथांमध्ये सापडतो तेंव्हा या महाराष्ट्र नावाच्या व्युत्पत्ती संदर्भात अनेक मत मतांतरे आढळुन येतात. आहेत.त्यात डॉ.बाबासाहेब यांच्या मतानुसार महारांचे राज्य महाराष्ट्र नसून महान राष्ट्र म्हणजे महाराष्ट्र होय.

## संदर्भ :

1. देव.शां.भा., महाराष्ट्राचा इतिहास ,प्रागैतिहासिक महाराष्ट्र ,खंड पहिला ,भाग 1, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ प्रथम आवृत्ती2002,पृ.क्र.20.
2. पाठक अरुणचंद्र (डॉ.)संपादक, इतिहास प्राचीन कालखंड भाग-एक,दर्शनिका विभाग महाराष्ट्र शासन मुंबइ,पृ.09.
3. पाठक अरुणचंद्र (डॉ.)संपादक, तत्रैव .

4. Mirashi V.V. The history and Inscriptions of the satwahans and the western kshatrapas p.137
5. Molesworth J.I. Dictionary Marathi, and English assisted by gcorge and Thomas condyred edition, 1857, p- 23 xxiii
6. केतकर श्रीधर व्यंकटेश (डॉ.)प्राचीन महाराष्ट्र (विभाग दोन)सातवाहन पर्व, वरदा प्रकाशन पुणे.पृ.15-16
7. शरद पाटील (कॉ.) दास शुद्रांची गुलामगीरी खंड 1 भाग 1 सावळाई प्रकाशन, शिरुर, दुसरी आवृत्ती पृ.74.
8. तुळपुळे शं. गो.मराठी वाङ:मयाचा इतिहास खंड पहिला महाराष्ट्रसाहित्य परिषद, पुणे, 1984,पृ.66.
9. केतकर श्रीधर व्यंकटेश (डॉ.) उपरोक्त पृ.30
10. तुळपुळे शं. गो., उपरोक्त ,पृ.66.
11. सहस्त्रबुदधे पु.ग. महाराष्ट्र संस्कृती,कॉन्टिनेंटल प्रकाशन पुणे,2003-पृ.क्र.41
12. राजवाडे वि.का. (संपा.)राधामाधवविलासचंपु वरदा प्रकाशन दुसरी आवृत्ती 1999, पुणे ,पृ.159
13. केतकर श्रीधर व्यंकटेश (डॉ.) उपरोक्त पृ.24
14. राजवाडे वि.का.(संपा.) उपरोक्त पृ.158
15. जोशी पंडित महादेव शास्त्री (संपा.) भारतीय संस्कृती कोश खंड 7वा प्रथम आवृत्ती पुर्नमुद्रण 2010, पृ.201
16. केतकर श्रीधर व्यंकटेश (डॉ.) उपरोक्त पृ.30
17. तत्रैव
18. जोशी पंडित महादेव शास्त्री (संपा.),उपरोक्त पृ.201
19. Opert Gustab (Dr.) The original inhabitant of india, orient publications, delhi, 1893 page-22.
20. Ambedkar B.R. (Dr.) Writing and speeches, vol-17 part , 2003, page-137-141.
21. वालदेकर का.रा.,महार आणि मराठीसांस्कृतिक अनुबंध ,संकेत प्रकाशन नागपूर,2015 पृ.क्र.71.